श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ८ वें ] अं ५. [ श्रावण

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवितमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| श्री साईबाबांसंबंधीं माझे हल्लींचे अनुभव | ... ... | १—३ |
| निष्ठा आणि सबुरी | ... ... ... ... | ४-१४ |
| अनुभव ... | ... ... ... ... ... | १५ |
| वासनात्मक सूक्ष्म देह | ... ... ... ... | १६-२३ |
| अहिंसा परमोधर्मः | ... ... ... ... | २४-२५ |
| सर्वांगपरिपूर्णता ... | ... ... ... ... | २६-२८ |
| अर्वाचीन-भक्तलीलामृत (पुढें चालू) | ... ... | १७-२४ |


## चुकीची दुरूस्ती

पृष्ठ ६, ओळ १ येथें शुद्ध ऐवजीं शब्द समजावें.
पृष्ठ २३, ओळ १२ येथें दिसणाऱ्या ऐवजीं दिसणारे समजावें.

# विनंति.


सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची " यशोदा पांडुरंगी " टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २--८--०.

**रा. आ. तर्खड**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**


## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड**

—प्रकाशक

ॐ तत्सत्

# श्रीसाईबाबांसंबंधानें माझे हलींचे अनुभव.

इ. स. १९११ पासून मी बाबांचे दर्शनास सवडीप्रमाणें जात असें. त्या वेळेपासून त्यांच्या नामस्मरणानें व त्यांच्या प्रार्थनेनें किती एक वेळां माझीं संकटें दूर झालीं आहेत हें मला बाबांचे चरणांवर विश्वास ठेवून प्रांजलपणें कबूल करावें लागतें. असो. त्या गोष्टी पुष्कळ आहेत; पण हलींचे एक दोन अनुभव प्रिय वाचकांसमोर ठेवावेत अशी उत्कट इच्छा एक महिन्यापासून झाली आहे.

१. इ. स. १[illegible]८ चे मे महिन्यांत मी एकदां माझ्या खोलींत स्वप्नस्थितींत असतां मला माझ्या मुलानें सुचविलें कीं, उद्यां (दुसरें दिवशीं) ऑफिसमध्यें माझेवर कांहीं आरोप येतील. (ह्या माझ्या मुलाचें नांव पांडुरंग होतें व तो ह्यापूर्वीं कांहीं महिने हें जग सोडून बाबांचे चरणीं वास करण्यास गेला होता.)

मुलाची ही सूचना अनपेक्षित होती, म्हणून त्यास मी माझ्या वडिलांस बोलावण्यास सांगितलें. त्यांनीं येऊन मला तसेंच सांगितलें. ऑफिसमध्यें माझें काम नीट चाललें होतें. व कांहींही दोष माझ्यावर येतील असें मला मुळींच वाटत नव्हतें. तरीही मनांत थोडा चरकलों, आणि मुलास व माझे वडिलांस साईबाबांस माझें संकट निवारण्यास विनंती करा, म्हणून सुचविलें.

दुसरे दिवशीं ऑफिसमध्यें जाऊन पाहातों तों माझ्यावर मगदूरपणाचा व काम चुकवाचुकवीचा आरोप एका प्रोफेसर साहेबांनीं ठेविला आहे, असें मला लिहून कळविण्यांत आलें.

वरिष्ठांस भेटून हा आरोप कांहींतरी गैरसमजुतीनें आलेला आहे असें मी समजावून सांगण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं.

त्याच रात्रीं स्वप्नस्थितींत मी श्री साईबाबांस विनंती करून सर्व हकीकत सांगितली; तेव्हां मला उत्तर मिळालें कीं, "मी सर्व नीट जमवून आणीन तूं कांहीं प्रयत्न करूं नकोस."

दुसरे दिवशीं ऑफिसमध्यें पारडें फिरलें, आणि ह्या बाबतींत माझा कांहींही दोष नाहीं असें अगदीं वरिष्ठांकडून लिहून आलें; परंतु एक बिचारा निरपराधी मुलगा त्या दोषास बळी पडून त्याला मात्र विनाकारण दंड झाला. हें सर्व पाहून ऑफिसच्या लोकांस मोठा अचंबा वाटला. शेवटीं माझ्या मनाचें कांहीं केल्या समाधान होईना. म्हणून मी पुन्हां साईबाबांस त्रास दिला; आणि विनंती केली कीं, माझ्यामुळें एक बिचारा निरपराधी मुलगा दंडास बळी पडला. बाबांनीं उत्तर दिलें कीं, त्याचाही दंड सुमारें ७३ दिवसांनीं आपोआप काढला जाईल. हें वर्तमान मी त्या मुलास कळविलें; तेव्हां तो बाबांची व आपल्या कुलदेवतेची आराधना करूं लागला.

बरोबर सत्तर दिवसांनीं कांहीं एक कारण नसतां त्या मुलाच्या वरिष्ठास त्याची दया येऊन त्यांनीं ऑफिसचे अगदीं वरिष्ठांस त्या मुलास जो मागें दंड झाला आहे तो काढून टाकावा अशी विनंति केली. त्यावरून वरिष्ठांनीं ७३ वे दिवशीं मेमो ( यादी ) पाठवून झालेला दंड काढून टाकला. मलाही आनंद झाला. त्या मुलाला तर अगदीं आनंद होऊन तो मनांतून बाबांचे चरणीं लागला.

माझे बाबतींत महत्त्वाची दुसरी गोष्ट झाली ती अशी:—

माझे मोठे मुलीसाठीं सातआठ वर्षांपूर्वीं आम्ही एक मुलगा पाहिला होता. मुलगा चांगला शिकत होता. त्याचे वडिलानेंही लग्नासंबंधानें रुकार दिला होता. आमच्या दोन्ही कुटुंबांचें दळणवळण पुष्कळ वर्षांपासून होतें. मुलगा चांगला शिकतो म्हणून आम्हीही मुलगी इंग्लिश शाळेंत घालून शिकविण्याची व्यवस्था केली. पुढें मुलगा मॅट्रिक पास होऊन कॉलेजमध्यें जाऊं लागला. मुलाचे वडील द्रव्याचे थोडेसे लोभी असल्यामुळें आटो-क्याच्या अगदीं बाहेर द्रव्यासंबंधानें अट घालूं लागले. शेवटीं १९२७ चे फेब्रुवारीचे महिन्यांत त्यांचा व माझा पत्रव्यवहार होऊन लग्नासंबंधानें सर्वच गोष्टी मोडल्या. माझे कुटुंबास फारच चिंता पडूं लागली; कारण आम्ही मागस-लेल्या जातींत असल्यामुळें आमचेमध्यें शिकलेलीं मुलें फारच कमी आहेत.

सुमारें दोन वर्षांपूर्वी मी साईबाबांस मुलीच्या लग्नाचा प्रश्न विचारला. "तूं कांहीं काळजी करूं नकोस तोच मुलगा मी जुळवून आणीन" असें त्यांनीं मला अभिवचन दिलें. गांवाहून वर्तमान आलें कीं, त्या मुलाला बराच हुंडा देऊन दुसरें कोणी आपली मुलगी देण्याच्या विचारांत असून त्याच वर्षीं ( इ. स. (१९२९) मे चे सुमारास मुलाचें लग्न होणार आहे. हें वर्तमान वाचून मला चिंता पडली; परंतु साईबाबांनीं पुन्हा " भिऊं नकोस, तें सर्व दोन वर्षांत मी जुळवून आणीन " असा दृष्टांत दिल्यावर मी अगदीं बाबांचे चरणीं विश्वास ठेऊन बेफिकीर राहिलों. गेले फेब्रुवारी महिन्यांत मुलाचे मनांत कांहीं प्रेरणा होऊन त्यानें आपल्या इतर वडील माणसांकडून आपल्या वडिलांची चांगली समजूत घालून आपण एकदां एखादे मुलीस लग्नाचें वचन दिल्यावर द्रव्याच्या लोभानें तें वचन मोडणें मोठें पातक आहे, हें आपल्या वडिलांचे मनांत चांगलें बिंबवून दिलें. हें सर्व मी तर अगदीं बाबांच्या इच्छेचाच खास प्रताप असें समजतों.

असो. गेले फेब्रुआरीचे आरंभास एकाएकीं मुलाचे वडिलानें आमचे गांवीं आमचे घरीं येऊन लग्नाचें बोलणें लाविलें; तेव्हां माझे कुटुंबास बाबांचे दयेची बालंबाल खात्री होऊन अगदीं आनंदानें सर्व वर्तमान मला लिहून कळविलें, आणि लवकर रजा घेऊन येण्यास विनंती केली. बिचाऱ्या आईचा जीव, आपल्या मुलीला इच्छित वर मिळतो हें पाहून वरचेवर बाबांचे गुण सर्वांस सांगत सुटली. मी गांवीं (मंगळुरास) गेल्याबरोबर तिचे आनंदाचे उद्गार निघाले कीं, " खरोखर बाबांनींच सर्व जुळवून आणिलें. मला तर अशा प्रकारानें गोष्टी घडून येतील अशी आशाच नव्हती. "

लग्न यथासांग आमचे पद्धतीप्रमाणें आटोपलें. कोणतीही अडचण आली नाहीं. खर्चासंबंधानें देखील माझा ठाम विश्वास आहे कीं, बाबांनींच मला हातभार लावून मला द्रव्याची मदत दिली. आतां बाबांचे चरणांशीं विनंती हीच कीं, त्यांनीं ह्या तरुण जोडप्यास सद्बुद्धि देऊन त्यांचा संसार नीट चालविण्यास हातभार लावावा.

बाबांचा सेवक,

गोपाळ गणेश भिडे

# निष्ठा आणि सबुरी

## निष्ठा

इ. स. १९१४ सालची ही गोष्ट. त्या वर्षाच्या विजयादशमीला आम्ही सर्व जण श्रींच्या दरबारांत बसलों असतां, कै. आण्णा बाबरे श्रींना म्हणाले " बाबा, देव काय केलें तर भेटेल ? " बाबा म्हणाले, "अरे ! देव भेटायला लोखंडाचे चणे खावे लागतात ! लई कठीण गोष्ट आहे बरं ! तरी पण देव लई मायाळू आहे ! अरे तो लांब कुठं आहे ? अगदीं अगदीं जवळ आहे; पण तो भेटायला निष्ठा आणि सबूरी पाहिजे. या दोन गोष्टी जवळ असल्यावर तो दूर नाहीं रे नाहीं. "

श्री साई बाबांनीं योगयाग वगैरे साधनें करावयाला सांगितलें नाहीं. प्रभुप्राप्ति अत्यंत कठीण गोष्ट असूनही ती निष्ठा आणि सबुरी या दोन साधनांनीं सहजसाध्य आहे, असें ते बोलत असत. हीं दोन साधनें आहेत तरी काय ?

"निष्ठा" म्हणजे विश्वास. देव आहे. या सर्व जगतांत आंत बाहेर सर्व ठिकाणीं तो ओतप्रोत भरलेला आहे. मागें वर्णन केलेली ( Cosmic energy) कॉस्मिक एनर्जी हें त्याच्याच सामर्थ्याचें आमच्या प्रचलित विद्रुते-प्रमाणे काळसरूपि वर्णन; पण पाहूं जातां या शब्दानें समाधान होतें काय ? नाहीं ! कां ? या शब्दानें कांहीं बोध होत नाहीं म्हणून !

"हे कॉस्मिक एनर्जी, तूं मला भेट दे " असें कळकळीनें बोलवेल तरी काय ? म्हणून त्या अगम्य अनाकलनीय अशा सामर्थ्याला प्रभूच्या चित्छक्तीला "Oh ! my God !" अरे माझे देवा ! " या अल्लाह " असा कांहीं तरी आपुलकीचा रूपक शब्द वापरावाच लागतो.

पाहिजे तितके निराकारवादी असा, **मला कळतें** या निरुपयोगी अहंमन्यतेनें प्रेरित होत्साते प्रेमानें प्रतीकपूजन करणाऱ्या मनुष्याला तुम्ही हांसा ! पण त्याला जें सात्विक समाधान होत असतें तें तुम्हाला मिळणे कठीण आहे.

लहान मूल ज्या प्रेमानें आपल्या बाहुलीला कवटाळीत असतें, तिचें चुंबन घेत असतें, त्याच्याबरोबर बोलत व खेळत असतें, त्याचें आपल्याला कौतुक वाटतें. पण आपल्या अहंमन्यतेमुळें त्या बाहुलीवर आपणाला तसें प्रेम करतां येत नाहीं. तरी पण तीच कृति दूर देशांत गेलेल्या अथवा मृत झालेल्या स्वकीय मनुष्याचें छायाचित्र पाहून अथवा त्याची आठवण झाल्यावर प्रेमाचा हुंदका प्रत्ययाला कां येतो ? त्या छाया अथवा मानस चित्राचें वारंवार चुंबन घेतांना सारासार बुद्धि कोठें लुप्त होते ?

अशी स्थिति जर आपण आपल्या पदोपदींच्या नित्य आचरणांत आणि अनुभवांत आणीत असतों, तर त्या परम प्रेमळ जगज्जननीचें मूर्त स्वरूप कल्पून त्यांत तल्लीन होऊन जर एखादें मनुष्य तिच्यावर तसें निष्ठेनें प्रेम ठेवीत असेल तर त्याचें तें तसें करणें त्याज्य ठरवून आपल्या शुष्क अहंकार-युक्त कोरडया ठणठणींत अंतःकरणानें जगज्जननीविषयीं अमूर्त आणि अगम्य अशीच भावना ठेवून तिची प्राप्ति होऊं शकेल काय ? आणि मग तिची प्रार्थना ती कशी करावयाची ?

" Efficacy of Prayer " म्हणजे प्रार्थनेचा इष्ट परिणाम हें वाक्य तोंडानें उच्चारणें सोपें आहे; पण तशी निराकाराची प्रार्थना करतांना मन तल्लीन होतें का ? देहभान विरतें का ? नाहीं. कां नाहीं ? मन एकाग्र होत नाहीं म्हणून. मन एकाग्र केल्याशिवाय कोणत्या तरी विषयाचा अभ्यास पूर्ण होऊं शकतो ? असें जर आहे तर प्रभुप्राप्तीसाठीं त्या गुणातीताचा एखादा गुण कल्पून त्या गुणावर लुब्ध होऊन त्याप्रमाणें त्याच्या स्वरूपाची भावना ठेवून अथवा निदान भ्रुकुटीमध्यें तेजबिंदूची स्थापना करून सर्व अहंकार झुगारून देऊन, केवळ बाळ वृत्तीनें आळविल्यावर, त्या कॉस्मिक एनर्जीरूपि जगज्जननीची काय प्राज्ञा आहे कीं, आपल्या प्रिय बालकाला त्यानें वांछिलेल्या इष्ट स्वरूपाचें दर्शन देऊन, त्याला कुरवाळून, त्याला त्याचें स्वतःचें, आपलें व जगाचें, अंतिम खरें स्वरूप एकच आहे याची साक्षात् अनुभवयुक्त जाणीव देऊन त्याच्या करवीं या जगाचें कोट कल्याण ती

करणार नाहीं ? यासाठींच ती कोरडया शुद्ध रूपि Cosmic Energy ( कॉस्मिक एनर्जी ) प्रभूची चिच्छक्ति आपलें जाज्वल्य तेजस्वी जगज्जननी रूप आपल्यावर प्रेम करणाऱ्या त्या बालकरूपि भक्तासाठीं धारण करते. तुम्ही म्हणाल तें कसें ? त्याला उत्तर "निष्ठा" निवळ कॉस्मिक एनर्जी शब्दापासून कांहींही बोध कदापि व्हावयाचा नाहींच. या कॉस्मिक एनर्जीचा यत्किंचित् तरी मागमूस लागला आहे ?

**विचार** हा एक आपल्या मनाचा गुण आपल्यामध्यें आहे ज्या विचाराची शक्ति व गति किती प्रचंड आहे आणि ती शक्ति व गति इच्छितां क्षणींच किती दूरवर जाऊं शकते याचें मागें विवेचन केलें आहे.

या आपल्या जड देहांत योग्य प्रकारचे जड पदार्थ शरीरसंवर्धनासाठीं अन्नरूपानें सेवन केल्यानें शरीर सतेज व सुदृढ राहून त्या करवीं या आपल्या अंतर्गत विचारशक्तीचें पोषण होऊन हीं सूक्ष्म शक्ति आपण निर्माण करून, या जड देहाच्या पतनापर्यंत, तिचें लालनपालन करीत असतों. जड देह-पतनानंतरही ह्या शक्तीनें निर्माण केलेलें विचार जगाच्या अंतापर्यंत राहावे अशी देखील स्थिति आहे.

आतां अन्न सेवन केल्यानें जड शरीराचें पोषण होतें त्यामुळें जड अन्नांत विचार उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे.

म्हणून त्या अन्नाचें सेवन करण्यापूर्वी जगज्जननीला तें मनोभावानें अर्पण करून त्या अन्नाला प्रेमभावनेनें प्रणाम करून, तें प्रसाद समजून सेवन केलें असतां, किती तरी अरस परस आदरयुक्त परिणाम घडत असत, त्याचा सूक्ष्म विचार करावा.

सारांश, सात्विक अन्न सेवन केल्यानें जड शरीराचें त्याच्या करवीं पोषण होऊन सुविचार उत्पन्न होऊन, आपण त्या कॉस्मिक एनर्जीचाच— प्रभूच्या चिच्छक्तीचाच एक प्रचंड प्रकार आपण आपल्यामध्यें निर्माण करीत असतों. त्या **विचार**शक्तीमार्फतच आपणाला त्या जगज्जननीच्या दर्शनासाठीं, संशोधनासाठीं जावयाचें आहे.

हें काम सुविचार त्वरेनें करतात. कुविचार तसें होणें लांबणीवर टाकतात, ज्याचें मागें विवेचन केलें आहे.

आपल्या संतांनीं यासाठींच दृष्टि उफराटी करावयास सांगितलें आहे. प्रभुप्राप्तीची ही पहिली पायरी. दृढ भरंवशानें लीन होऊन हे देवा, मला कांहीं कळत नाहीं. तुझ्यावर प्रीति कशी करावी आणि ठेवावी हें तूं मला शिकव. दुसरें मला कांहीं नको. तार, मार पाहिजे तें कर. हा संसार, ही बायको, मुलें, आप्तवर्ग व इतर सर्व तुझेच आहेत; त्या सर्वांमध्यें सर्व बाजूंनीं सर्व प्रकारांनीं तुझीच वस्ती परिपूर्ण अशी जी तुझी कॉस्मिक एनर्जीरूपि चिच्छक्ति, त्या तुझ्या शक्तीनेंच तुला प्रत्यक्ष कसें जाणावें, अनुभवावें, याचें स्वल्प तरी ज्ञान अथवा खूण दे. जेणेंकरून तुझा निदिध्यास लागून तुझें साक्षात् रूप मला कळेल तरच माझ्या मनाला समाधान वाटेल. हें मन--ही कुडी तुझीच आहे. या कुडीमध्यें तूं आणि मी या दोन स्वतंत्र व्यक्ति कशा राहूं शकतील ? तर मग मी कोण ? तुझ्या व्यतिरिक्त **मी** ला अस्तित्वच होऊं शकत नाहीं. अशा प्रकारची रात्रंदिवस वासना, घोषणा, दृढ विश्वास, दृढ विचार तीच ' **निष्ठा.** '

लेखकासारख्या क्षुद्र अनधिकारी इसमानें या गहन विषयावर लेख लिहिणें हें केवळ धाडस होय. पण 'कॉस्मिक एनर्जी' या कोरड्या शब्दानें आधुनिक विद्वानांचें समाधान कधींहीं व्हावयाचें नाहीं. यवनादि इतर करतात तशा प्रकारच्या निराकाराच्या प्रार्थनारूपि शुष्क वल्गनेपासून आपणाला अंतिम बोध व्हावयाचा नाहीं म्हणून श्री सहस्रबुद्धे यांनीं मागील एका लेखांत एकलव्याचा जो दाखला दिला आहे त्याप्रमाणें आपल्या संतांनीं दाखविलेल्या मार्गाचें अवलंबन करून त्या कॉस्मिक एनर्जी-रूपि प्रभूच्या चिच्छक्तिरूपि जगन्मातेवर दृढ विश्वास व प्रेम ठेवून तिची भक्ति केली तरच या नरतनूचें सार्थक व्हावयाचें आहे. अशी जी दृढतम खात्री, विश्वास, तीच बाबांची " निष्ठा." प्रभुप्राप्तीसाठीं अशा प्रकारची निष्ठा ठेवणें हें कांहीं सोपें काम नव्हे ?

वरें आपल्यासारख्या साधारण माणसाची देवाच्या ठिकाणी किती क्षुद्र प्रकारची भावना असते ! प्रभूची भक्ति करावयाची कां ? तर तिच्यापासून आपली ऐहिक स्थिति सुधारावी. ऐहिक वस्तु, दासदासी, बागबगीचे, बंगले, यांची सारखी वृद्धि व्हावी, ऐटीनें मोटरमध्यें बसून पायीं चालणाऱ्या वाटसरूंकडे वाघोबाप्रमाणें "**खाऊं का गिळूं**" या दृष्टीनें पाहात असावें आणि यासाठीं देवाच्या मूर्तीसमोर थाटामाटानें सोन्याचांदीचा अथवा कधीं कधीं गिलिट केलेल्या बेगडी उपकरणांचा दांभिक पसारा घालून पूजेला बसावें, अथवा संन्यस्त वृत्तीचा आव घालून भोळ्याभाबड्या लोकांना स्वतःच्या भजनीं लावावें अशाच प्रकारचें बहुधा आपलें ध्येय असतें. तसें करतांना पुढें मागें स्फोट होऊन भीक मागण्याची पाळी न यावी म्हणून प्रच्छन्न अथवा उघड रीतीनीं आपल्या भजनीं लागणाऱ्या भोळ्याभाबड्या स्त्रीपुरुषांकडून वाडया, वतनें, इस्टेटी आपल्या नांवावर करवून घेणें ! आणि असें करतांना तोंडानें म्हणावयाचें--काय हो ! आम्हाला हें मुळींच पसंत नाहीं. परंतु आमचा निरुपाय आहे. कारण आमच्या नशीबीं **राजयोग** आहे ! "

अशा प्रकारची फसवेगिरी आपण हरहमेश पाहात असतों, आणि प्रसंगीं करीतही असतों. शेंकडों गोरगरीब श्रद्धाळू माणसें अशा भोंदु साधूंच्या नादीं लागून नागवत असतात. आणि त्यांची तशी शोचनीय स्थिति पाहून आधुनिक विद्वान् नाकें मुरडतात. आणि तसें करतांना Agnostic नास्तिक असल्याचा डौल मिरवून पाश्चात्यांच्या चैनी वृत्तीचेंच तितकें अनुकरण करून स्वतःला पण ते फसवून घेत असतात. त्यांचीं मुलें माणसें त्यामुळें विशेष स्वच्छंदी निघाल्यास नवल तें काय ?

सारांश, जेथें तेथें फसवेगिरीचाच प्रकार दिवसेंदिवस विशेष होऊन सत्यापासून दूर दूर असेंच आचरण राहून, संतांच्या शिकवणींपासून जनता भ्रुकत जाऊन प्रतिदिनी दैन्यावस्था वाढत आहे. अशा वेळीं बंगाल्यांत श्री रामकृष्ण परमहंसांचा अवतार प्रगट होऊन त्यांनीं आपल्या

अप्रतिम निष्ठेनें त्याच कॉस्मिक एनर्जीचें--श्री दुर्गारूपि जगन्मातेचें दर्शन प्राप्त करून घेऊन, आपल्या श्री विवेकानंदादि तेजस्वी आणि ओजस्वी शिष्यांकरवी आपल्या संतांच्या धर्माची जाणीव उत्पन्न करवून वर वर्णन केलेल्या अनास्थेला आळा घातला.

हीच जागृति श्री काशी क्षेत्रीं श्रीभास्करानंद सरस्वति व श्री त्रैलंग स्वामीं या दोन महा पुरुषांनीं त्याच वेळीं उत्पन्न केली. दक्षिणेंत अलीकडच्या अलौकिक पुरुषांत अक्कलकोटचे स्वामी महाराज आणि त्यांच्या पश्चात् श्री साईबाबा हे प्रमुख होत.

श्री साईबाबांनीं आपला मठ स्थापन केला नाहीं. आणि **कोणाही व्यक्तीला आपल्यामागें आपल्या गादीवर बसविलें नाहीं,** वाड्या वतनें केलीं नाहींत. दररोज सकाळीं चार घरीं भिक्षा मागून, त्या भिक्षान्नाची आपल्या जवळपासच्या बाळगोपाळांत वांटणी करून त्यांतल्या एक दोन टिचभर भाकरीच्या तुकड्यांवर ते निर्वाह करीत असत. बसावयाला एक गोणपाटाचें रकटें, जगावर सर्वस्वी मालकी असूनही अत्यंत लीन असें अनिर्वचनीय रत्न, श्री साई माउलीच. अशा अलौकिक, दिव्य व पुण्य पुरुषांच्या **पायावर मस्तक ठेवलें असून, आणि त्यांचा वरद हस्त शिरावर घेतला असूनही, इतर ठिकाणीं कोणाला जाववतें पण कसें, याचें लेखकाला राहून राहून सखेदाश्चर्य वाटत आहे.** आणि श्री रामदास यांच्यापासून मंत्रप्राप्ति घेऊन वणवण करणाऱ्या इसमाची आठवण होते. पाहिला साधू पड त्याच्या पायां, कां ? तर ते साईबाबा आहेत. असे प्रकार नित्य पाहाण्यांत येत आहेत. ही प्रभुप्राप्तीसाठीं झोंके खाणारी निष्ठा फलद्रूप न झाली तर त्यांत देवाची अथवा श्री साईबाबांची काय कसूर !

श्री साईबाबांच्या पायांपाशीं हजारों स्त्रीपुरुष येऊन गेले त्या त्या प्रत्येकांत परमेश्वराच्या ठायीं निष्ठा ठेवण्याची त्यांनीं त्यांच्या तयारीप्रमाणें हुरूप आणली व अद्यापिही आणीत आहेत. श्री साई बाबांचीं खरीं गुप्त रत्नें किती आणि कोठें असतील हें त्यांचें त्यांनाच ठाऊक. **तीं उघड बाजारांत** कधींही दिसावयाचीं नाहींत.

असो. आपण **निष्ठा** या शब्दाविषयीं आणखी विचार करूं मायलेकरांची अरसपरस एकमेकांवरची निष्ठा अहेतुयुक्त व निर्व्याज असली तरच त्या निष्ठेतून काय सामर्थ्य उत्पन्न होतें याचा दाखला श्री मन्महा भारतांत श्री व्याधगीतेंत उत्तम प्रकारें गायिलेला आहे.

सुखासमाधानानें संसार तरून जाण्यासाठीं तसें आचरण ठेवावयाचें नाहीं. काय सामर्थ्य प्राप्त होतें तें अनुभवावयाचें नाहीं. भाकडकथा भाकडकथा म्हणून ओरडत बसावयाचें. खरें व्यक्तिस्वातंत्र्य तें काय याचा मुळींच विचार करावयाचा नाहीं आणि इंद्रियांना स्वैर वर्तन करूं देणें याला व्यक्तिस्वातंत्र्य म्हणावयाचें. यापासून फलप्राप्ति कोणत्या प्रकारची होईल? आनंद प्राप्त होईल? होय. क्षणिक इंद्रियें कधीं तरी तृप्त होतील? नाहीं. पुढें? पुढें लेखका-सारख्या अल्पमतीनें काय लिहावें! चारही बाजूनीं नजर फेंकली तर दिवसें-दिवस सर्व जनता किती झपाट्यानें ऱ्हास पावत आहे हें उघड दिसून येत आहे.

इंद्रियांचीच सेवा करावयाची, सर्व काळ विषयाचें ध्यान यांची अंतिम गति श्री भगवंतांनीं श्री गीतेंत अध्याय २, श्लोक ६२--६३ यांत स्पष्ट वर्णन[१] केलेली आहे. हे श्लोक लक्षपूर्वक वाचून त्यांचें मनन करावें.

संतांच्या कृपेनें या श्लोकांतलें रहस्य आपणांला जरूर कळून आयली जनता या भयंकर स्थितींतून निभावून चांगले दिवस पाहील. तसें घडण्यापूर्वीं पाश्चात्य संस्कृतीनें निरर्थक भुलून जाऊन जे जे केवळ त्यांचेंच अनुकरण करून त्यांच्याचप्रमाणें विषयसेवनामागेंच लागतील त्यांचा ऱ्हास ठरलेलाच आहे.

पाश्चात्यांची प्रचलित संस्कृति त्यांच्या धर्माप्रमाणें मुळींच नाहीं. क्रिश्चियानिटी आणि प्रचलित चर्चियानिटी यांत मुळींच साम्यता दिसून येत नाहीं. क्रिश्चियानिटी ज्याप्रमाणें येशुख्रिस्त महात्म्यानें जगाच्या निदर्शनाला आणिली त्याचें रहस्य प्रत्येक हिंदू पूर्णपणें जाणतो आणि सध्या महात्मा गांधी हे त्यांच्या प्रत्यक्ष आचरणानें या धर्माचें खरें रहस्य जगापुढें ठेवित आहेत. ज्याविषयीं मुळींच मतभेद नाहीं.

---

१ श्री विवेकानंदांचे हे शब्द आहेत.

# सबूरी

सबूरी म्हणजे काय ? सबूर असणें म्हणजे थांबणें, उभें राहाणें. प्रभु-
..तीसाठीं निष्ठा ठेवण्यासोबत मन निश्चित व स्थिर ठेविलें पाहिजे.

म्हणून प्रभूवर निष्ठायुक्त प्रेम करतांना फलाशाविरहित शांत राहाणें
**सबूरी.**

प्रभुप्राप्तीसाठीं झटणाऱ्या मनुष्यावर सर्व प्रकारच्या मोहनी व संकट-
रंपरा इतरांपेक्षां विशेष प्रमाणानें येत असतात. जगांत 'सती घरीं न मिळे
..त्ति आणि रांडे घरीं झुले हत्ती' ह्याच प्रकार दिसून येऊन भक्ताच्या मनाचें
..ांदोलन आणि चलबिचलन सारखें चालू असतें.

त्याचें प्रेम आपल्यावर कसें आहे हें पाहाण्यासाठीं जगन्माता त्याच्या
विशेषत: तरुणपणांत त्याच्या इंद्रियरूपि खेळण्यास विशेष अवसर मिळावा
..ून कनक आणि कांता यांची जोड देऊन नंतर अधिकाररूपि मद उत्पन्न
..रून त्याच्या मनाचें परीक्षण करीत असतें आणि हळूहळू आपण त्याच्यापासून
**..याच्याच विचाररूपांनीं** दूर दूर होत जाते. तरी पण मधून मधून
..ाप्तवर्गाच्या मृत्यूचा खेळ दाखवून आपली आठवण होण्यासाठीं जागृति
..त्पन्न करीत असते. इतकें असूनही तो मनुष्य ह्या सर्व प्रकार पाहून त्या
..ेळांत गुरफटून न जातां ही तुझीच लीला आहे असें पक्कें मानून आपल्या
..रणप्राप्तीसाठीं सारखें हपापलेलें आहे असें जेव्हां ती पहाते तेव्हां ती त्याला
..मेकारी करून संकटांमागून संकटें पाठवून त्याला 'दे माय धरणी ठाय'
..रून सोडते.

इतकें होऊनही जेव्हां तें मनुष्य ही तुझीच इच्छा आहे, तुझाच खेळ
..ाहे असें जाणून मनाला पूर्ण आटोक्यांत ठेऊन सुखदु:खांच्या विचारांचा
..गडा त्याच्यावर न पडूं देतां त्या जगन्मातेच्याच पायांकडे सारखें लक्ष ठेवून
..सतें, तेव्हां त्या निष्ठेला आणि सबुरीला पाहून-माताच ती—तिचें अंत:करण
..ून त्या भक्तरूपि बालकाला उचलून त्याचें चुंबन घेऊन त्याच्या संसाराचा

बेडा ती सुखासमाधानानें पार करते. इतकेंच नाहीं तर त्याच्या संसाराची मर्यादा अफाट करून जगाचीं सर्व कालचीं सर्व मनुष्यें त्याचींच बालकें आहेत अशाच दृढ विश्वासानें जगाचें कायमचें कल्याण व्हावें असेंच त्याचें पुढील आचरण असतें. सर्व संतांच्या चरित्राची छाननी करतां हाच प्रकार दिसून येतो. म्हातारपणीं तयारी होणें फार कठीण. संतांनीं आपल्या उत्तम गतीचा पाया आपल्या पूर्वाश्रमाच्याच आयुष्यांत घट्ट घातलेला दिसून येतो.

शमदमादि योगसाधनांचा बिकट मार्ग सांगून श्री साईबाबांनीं कोणा-लाही घाबरवून सोडून निरुत्साही केलें नाहीं; पण गंमत पहा कीं, निष्ठा आणि सबूरी या दोन साधनांत सूक्ष्म रीतीनें पाहूं गेलें असतां शमदमादि साधनांचा आपण होऊन समावेश होतच असतो.

सुलभ रीतीनें आपण लोकांस तसेंच पाश्चात्य विद्येच्या मुलाम्यानें बेफाम झालेल्या इसमांना श्री साईबाबांनीं किती गोड आणि मायाळू रीतीनें त्यांच्या त्यांच्या तयारीप्रमाणें भक्तिमार्गाला लावून त्यांच्या मनाचें कसें समा-धान केलें आहे याची आठवण होऊन अंतःकरण भरून येतें. याविषयींचा एक लहानसा दाखला:—

"आये ! तूं आलीस ! बरं केलंस. बरोबर या भाऊलाच आणलास ?"

इ. स. १९१८ च्या मे महिन्यांतली ही गोष्ट. धाकट्या मुलाला मे महिन्याची सुटी पडल्यामुळें त्याच्याबरोबर माझ्या स्नेह्याची बायको त्या मुलाला बरोबर घेऊन श्रींच्या दर्शनाला गेली होती.

त्या दोघांना पाहातांच वरीलप्रमाणें प्रेमाचे उद्गार श्रींच्या मुखांतून निघाले.

बाई म्हणाली, " बाबा दुसऱ्या मुलांना रजा नाहीं. "

बाबा म्हणाले, " आये, अलिकडे किनई मी लई बेजार झालु आहं. कुणाला पैका पाहिजे तर कुणाला बाईल पाहिजे तर कुणाला ल्योक पाहिजेत. अग ! माझ्याजवळ आहे तें तर कुणीबी मागत नाहीं. बघीन बघीन आन् एकाद् दिवस अस्साच गपूचिप् चालला जाईन. अग लई कंटाळा आलाय् !"
( बाबांनीं त्याच वर्षी दसऱ्याला देह ठेवला ! )

" बाबा ! हें असं काय बोलतां ! मग आमचं कसं होईल ? "

" आये ! तूं ग कशापायीं चिंता करतीस ? अग तुझ्या संसाराची चिंता रातदिवस देवाला आहे ना ? माझीं बालगोपालं आलीं कीं मला लय बरं वाटतं आणि मला दोन घांस आनंदानें जातात आन् मूठभर मांस वाढतं !"

तेव्हां तो मुलगा म्हणाला, "बाबा ! तुमच्याजवळ आहे तें मागण्यासाठीं तर आम्ही तुमच्या पायांपाशीं येतों, आणि तुम्ही तें जाणतां ! "

" अरे ! तें तुला मिळेल रे."

" त्याची आम्हाला पूर्ण खातरी आहे, पण बाबा केव्हां ?"

" अरे अगदीं लवकर देईन. "

" बाबा मला तुमचें खास आश्वासन पाहिजे कीं, मला त्याच्यासाठीं अमूक जन्म घ्यावे लागतील ते. "

अरे आणखी तीन जन्म पुरे.

" पण बाबा तोंवर सर्वकाळ आमच्याजवळ असाल ना ? "

" अरे ! तुमच्या सगळ्यांबरोबर आज कितीतरी जन्म मी आहें. ( भ. गी. अध्याय ४, श्लोक ५ ) आणि आपुन पुनः पुन्हां मिळूं ! माझ्या बालगोपाळांची चिंता मला रातदिस सारखी ठेवावी लागते, आणि कवडी कवडीचा हिशोब मला देवाला द्यावा लागतो. "

त्या मायलेकरांबरोबर झालेले इतर संवाद लेखकांखेरीज अनेकांनीं ऐकले आहेत आणि त्याविषयीं कौतुक वाटून आपापल्यापरीनें त्यांनीं बोध घेतला आहे.

जिज्ञासु आणि मुमुक्षूंना साधक आणि त्यानंतर सिद्धावस्थेंत कसें सुलभ तऱ्हेनें नेतां येईल यासाठीं श्री साईबाबांची सतत खटपट चालू होती व आहेही. कुणाला अमुक अमुक पोथ्यापुस्तकांचें अध्ययन करण्याला लावून, कुणाला जागृत अथवा स्वप्नसृष्टींत साक्षात् दर्शन देऊन. आणि तशा स्थितींत

न विसरणारें असें संभाषण अथवा उपदेश अथवा दाखला देऊन कुणाला उपनिषदांत वर्णन केलेल्या इतर साधनांनीं पूर्ण प्रोत्साहन देऊन, अशा अनेक प्रकारच्या आणि अनेक तऱ्हांच्या लीलांनीं प्रत्येकाला त्याच्या त्याच्या तयारीप्रमाणें आत्मोन्नतीचे मार्ग श्री साईबाबा दाखवीत आले आणि अद्यापिही दाखवीत आहेत.

अनेक भक्तांनीं श्री साईमाउलीच्या मुखांतून " निष्ठा आणि सबूरी " हे शब्द ऐकले आहेत. याविषयीं साधारयुक्त विवेचन पाठविल्यास श्रींच्या भक्तमंडळाला व इतरांना प्रेमामृताचा भरपूर प्याला पाजल्याचें श्रेय ते जरूर मिळवितील.

ज्या प्याल्यासाठीं उत्कंठेनें हपापलेला

" म्हातारा "

" म्हातारा " यांचे लेख पाश्चात्यशास्त्राच्या अध्ययनांनीं गोंधळून जाऊन दिशाभूल होणाऱ्यासाठींच आहेत हें वाचकांनीं विसरूं नये; कारण इतरांना ते लेख पाल्हाळयुक्त व कंटाळवाणे वाटण्याचा संभव आहे.

—संपादक

# श्री सद्गुरु साईनाथ महाराज प्रसन्न.

श्रीयुत संपादकः—साईलीला मासिक, मुंबई यांसः—

सा. न. वि. वि. खालील मजकुरास आपले मासिकांत स्थळ मिळेल अशी आशा आहे.

मी पुष्कळ वर्षांपासून बाबांचा एकनिष्ठ भक्त आहे. बाबांच्या कृपेनें नाशिक येथें मिळालेल्या घरांत दर्यापूर येथील कै. माधवराव चितळे वकील यांचें कुटुंब श्रीमति गंगुताई व कुमार गजानन व कुमारी सुशीलाबाई ही मंडळी गेल्या मे महिन्यांत उन्हाळ्यांत हवा बदलण्यास आली होती; तेव्हां कुमारी सुशीलाबाई एके दिवशीं एकदम तापानें आजारी पडून १०६ डिग्री ताप चढला. डॉक्टरांचे औषधोपचार केले, परंतु ताप मुळींच कमी होईना व मुलगी या दुखण्यांतून पार पडण्याचीं आशा नव्हती; परंतु मजपाशीं असलेली बाबांची उदी मी शेवटचा इलाज म्हणून मुलीचे तोंडांत दिली व तिचा धूप दाखविला. तसेंच बाबांचा फोटो मुलीचे उशाकडे ठेवून सद्गुरूची प्रार्थना केली कीं, " हे नाथ ! या गरीब व अनाथ मुलीला आमचे घरीं आराम पडूं द्या" श्री सद्गुरूंची लीला अगाधच. उदी दिल्यापासून दोन तासांचे आंत ताप कमी होण्यास लागला व सुमारें ५।६ तासांनीं मुलगी शुद्धीवर आली. पुढें दोनचार दिवसांत मुलगी चांगली झाली व ती मंडळी सुखरूपपणें दर्यापूर येथें परत गेली. जातांना त्यांनीं बाबांचे कायमनिधीकडे देण्याकरितां मजपाशीं पांच रुपये दिलेले अलाहिदा मनिऑर्डरीनें आपलेकडे पाठविले आहेत. तरी कायम फंडांत जमा करणेची कृपा व्हावी. कळावें, लोभ असावा, हे विनंती.

नाशिक. मेन रोड,
घर नं. ४३.

बाबांचा भक्त,
लक्ष्मण गोविंद मुंगी.

# वासनात्मक सूक्ष्म देह

"बाबासाहेब ! तुम्ही हें वासनात्मक सूक्ष्म देह म्हणून जें घेऊन बसलांत तें आम्हांला कळेल अशा तऱ्हेनें सांगा. श्री साईबाबांसारख्या पुण्य पुरुषांना हें कळतें असें तुम्ही सांगतां, परंतु आमच्या मनाचें समाधान होत नाहीं.

"हें पहा ! पितरं दाखीव तरच श्राद्ध करतों. अशांतला तुमचा प्रकार दिसतो. तरी पण या बाबतींत आपणांला स्थूल दृष्टीनें जिथवर जाववेल तिथवर जाण्याचा प्रयत्न करूं या."

मित्र त्या विद्वान गृहस्थाला म्हणाला, "आपण प्राणिशास्त्राचें (Biology व वनस्पतिशास्त्राचें Botany अध्ययन केलें आहे ना ?

"होय."

"हरभरा, वाल, फणसाचें बीं अथवा आंब्याची कोय, या पाऊसाच्या दिवसांत मातींत पडून त्यावर पाणी पडलें असतां त्या बींमध्यें जो सूक्ष्म पण डोळ्यांनीं दिसणारा कोंब असतो, त्याला स्फूर्ति होऊन एक भाग मूळरूपानें जमिनींत खोल रुतत जाऊन त्याच्या करवीं पाणी व इतर पोषक द्रव्यांचें शोषण होऊन दुसरा भाग जो जमिनीवर वाढत जातो त्याला पालवी फुटून त्या त्या बीचें त्याच्याच जातीचें झाड निर्माण होऊन पुढें त्याला फुलें व फळें धरतात. याप्रमाणें रहाटगाडगें चाललें असतें ना ?"

"होय."

"मग तें बी मातींत पडून त्यावर पाणी पडण्यापूर्वी जो त्याच्यांतील कोंब डोळ्यांनीं दिसत होता त्या कोंबांत आपण त्या प्रकारचें झाड व्हावें, व फळें, फुलेंयुक्त संसार करून आपल्याच प्रकारचीं अनेक बियाणीं निर्माण व्हावीं, हा सूक्ष्म हेतु जसा काय त्याच्या निद्रित अवस्थेत होता, पण माती आणि पाणी यांची मनोहर जोड मिळाल्यामुळें, त्या निद्रिस्त अवस्थेला झुगारून देऊन, खडबडीत जागें होऊन पूर्ण प्रोत्साहनानें व उमेदवारीनें आपलें पुढील कर्तव्य जाणून त्याप्रमाणें तो बीचा सूक्ष्म कोंब प्रत्यक्ष सप्रमाण कृति दाखवितो ना ?"

"होय."

"पहा बुवा येथेंही थांबतां येत नाहीं. याच्याही पलीकडे गेलें पाहिजे. तें बीं उत्पन्न होण्यापूर्वीं काय गोष्टी घडल्या?"

"तें फुलांतून पैदा झालें."

"तें कसें?" तेव्हां तो विद्वान् गृहस्थ मित्राला म्हणाला, "त्या फुलांत पूं-केसर व स्त्री--केसर धारण करणारे असे दोन प्रकारचे अवयव होते. त्या पूं-केसरांतील अतिसूक्ष्म, डोळ्यांना न दिसणारे असे पराग, वाऱ्यानें उडून अथवा मधमाशा वगैरेंच्या पायांना लागून त्या स्त्री--केसररूपि अवयवांना चिकटल्याबरोबर त्या पूं--केसररूपि परिमाणूला स्फूर्ति होऊन तो त्या फुलाच्या आंत एक तंतु मुळाप्रमाणें सोडीत असतो. हा तंतु त्या फुलाच्या देठांत पोहोंचल्यावर तेथें बीं निर्माण होऊन त्या फुलाची कामगिरी संपून तें फुल सुकतें व गळून पडतें."

मित्र म्हणाला, "हें तुम्ही कशावरून सांगतां?"

"सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिल्यावर हें सहज कळतें."

"पण साधारण माणसाला हें कसें कळावें? त्याला त्या फुलांत ही घडत असलेली कृति त्याच्या डोळ्यांनीं सूक्ष्मदर्शक यंत्राच्या अभावीं दिसण्यासारखी आहे काय?"

"नाहीं."

"मग तो जर म्हणाला हें तुम्ही कांहीं तरी सांगतां तर तुम्ही त्याला काय म्हणाल?"

"या गोष्टीविषयीं त्याच्यांत पूर्ण अज्ञान आहे."

"असो! प्राणिशास्त्रांत अशीच परिस्थिति आहे ना?"

"होय."

"पाण्यांतील मासे वगैरे खालच्या दर्जाच्या प्राण्यांत आपणापासून एकाच वेळीं असंख्य प्राणी उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे ना?"

"होय."

" जसजसा अकलेच्या प्रमाणें वरवरच्या स्थितींतला प्राणी आढळतो नसतसें त्याचें आपणांसारखींच प्रतिबिंबें एकाच वेळीं उत्पन्न करण्याचें सामर्थ्य कमी कमी दिसत येऊन, सरते शेवटीं सस्तन माकडें व मनुष्यें या उच्च कोटींतल्या प्राण्यांत एकाच वेळीं एकच, अगदीं अगदीं विरळा, दोन अथवा तीन, इतकेच प्राणी उत्पन्न करण्याचें सामर्थ्य दिसून येतें ? "

" होय. "

" आतां आपण पुन्हां पालुपदावर येऊं. सूक्ष्मदर्शक यंत्रांतून सस्तन प्राण्याचें रेत तपासतां केवळ सुईच्या अग्रावर राहील इतक्या सूक्ष्म बिंदूत लक्षावधि जिवंत परिमाणु इतस्ततः वेगानें परिभ्रमण करतांना दिसतात ना ?

" होय. "

"त्यांतला एकच परिमाणु स्त्रीच्या शरीरांतर्गत ठराविक वेळीं उत्पन्न होणाऱ्या एकच अत्यंत सूक्ष्म अशा अंडज परिमाणूला स्पर्श करून परिमाणूंत त्याच प्रमाणें प्राणी उत्पन्न करण्याची चेतना देऊन नंतर त्या प्राण्याची वाढ त्या स्त्रीच्या शरीरांत ठराविक मुदतीपर्यंत होऊन पूर्ण शरीरयुक्त प्राणी जन्माला येतो हें खरें ना ? "

" होय. "

"सस्तन उच्च कोटींतल्या प्राण्यांच्या मादीच्या शरीरांत ठराविक वेळीं जें सूक्ष्म अंड उत्पन्न होतें त्याला क्वचित प्रसंगींच जर वरील वर्णन केलेल्या जींवंत सूक्ष्म पण चलनयुक्त अशा परिमाणूंचा स्पर्श झाला तरच त्या अंड परिमाणूला गर्भधारणा करण्याची स्फूर्ति होते. तसें न झाल्यास त्याचा नाश होतो. याप्रमाणें त्या रेताच्या बिंदूतल्या कोटयावधि जींवंत परिमाणूंपैकीं एकच परिमाणू देहधारणासाठीं भाग्यवान होऊन बाकीच्यांची देहधारणेची वासना व धडपड निष्फळ होऊन त्यांचा नाश होत असतो ! "

"होय."

" यावरून पहातां या आपल्या उच्च कोटींतल्या प्राण्यांच्या शरीरांत

ते उत्पन्न करण्याचें अतर्क्य सामर्थ्य आपणामध्यें आहे, हें आतां तुम्हांला कबूल करावें लागतें ना ?"

"होय."

"हे जीवंत सूक्ष्म परिमाणू सूक्ष्मदर्शक यंत्राच्या अभावीं साधारण मनुष्याच्या स्थूल दृष्टीला न दिसल्यामुळें ते अस्तित्वांत नाहींत असें त्यानें म्हटल्यास तुम्हांला त्याच्या अज्ञानाची कींव वाटेल !"

"होय."

"याच प्रमाणानें योग्य अनुभवाच्या अथवा तशाच योगसाधनांच्या अभावीं स्थूल देहविमुक्त वासनात्मक देह आहेत जे प्रचलित यंत्रद्वारें दिसणें असंभवनीय आहे असें श्री साईबाबांसारख्या दिव्य देहधारिन् पूर्ण अनुभवी अशा सत्पुरुषांनीं प्रतिपादन केल्यास तसें नाहीं असें बोलण्याचा आपणांस अधिकार प्राप्त होतो ?"

"परंतु हें समजावें कसें ?"

"ज्याप्रमाणें वरील प्रकारांत सूक्ष्मदर्शक यंत्राची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणें ह वासनात्मक सूक्ष्म लिंगदेह साक्षात् अनुभविण्यास योग-मार्गाचेंच अवलंबन केलें पाहिजे. आकाश तत्त्वाचें आकलन होईपर्यंत अभ्यास झाला पाहिजे. आम्हांला आमच्या चर्मचक्षूंनीं दिसत नाहीं-सबब नाहीं, हें बोलणें गैर आहे असें आतां कबूल केलें पाहिजे ना ?"

"होय."

याप्रमाणें माझ्या स्नेह्याच्या आणि त्याच्या विद्वान् मित्राच्या दरम्यान जो संवाद झाला तो जसाचा तसा वर देण्यांत आला आहे.

या संवादापासून काय बोध घेतां येतो ?

१ वर वर्णन केलेल्या अनंतकोटि जीवंत देहधारिणोत्सुक परिमाणु उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आपल्या शरीरांत आहे. रोजच्या परिचयाची ही गोष्ट असल्यामुळें या सामर्थ्याच्या थोरवीबद्दल व्हावा तितका विचार होत नाहीं.

२ या सामर्थ्याचा विनाकारण व्यय व नाश न व्हावा यासाठींच ब्रह्मचर्याची उपयुक्तता आहे

३ केवळ प्रजोत्पत्तीच्याच हेतूनें ऋतुकाळीं स्वस्त्रीला स्पर्श करण्याची जी शास्त्राज्ञा आहे तिचा हेतूच हा कीं, या सामर्थ्याचा विनाकारण विनाश न व्हावा, व तसें आचरण ठेविल्यास गृहस्थाश्रम्याला व त्याच्या सुगृहिणीला पूर्ण ब्रह्मचर्याची योग्यता व त्यामुळें स्वाभाविक रीतीनें उत्पन्न होणारें सामर्थ्य प्राप्त होत असतें.

४ याप्रमाणें आपल्या अंतर्गत असलेल्या सामर्थ्याचा जपून विनियोग व विकास केल्यास त्याचा परिणाम शरीरावर व मनावर होऊन तो देह सतेज व ओजसयुक्त होतो.

५ प्रथमतः शरीर निरोगी होतें, आत्मसामर्थ्य वाढतें आणि हातीं घेतलेलीं कार्यें सहज सिद्धीस जातात.

६ उर्ध्वरेता होणें ही त्याची पुढली पायरी. उर्ध्वरेत्याचें महात्म्य पुराणांत व शास्त्रांत गायिलेलें आहे, तें प्रत्यक्ष अनुभवावरून आहे. अशांची संतति त्यांच्याचप्रमाणें अत्यंत दीर्घायु, सुसंस्कृत आणि सामर्थ्यवान् अशी निपजते.

७ स्वस्त्रीला केवळ हक्काच्या वारांगनेप्रमाणें वागविणें यांत उभयतांचा व स्वकुलाचा ऱ्हास व नाश ठरलेलाच.

८ याच कारणामुळें स्वच्छंदवृत्तियुक्त राहून गर्भधारणा न होण्यासाठीं पाश्चात्यांचीं कृत्रिम साधनें, हीं सर्वथैव त्याज्य.

९ वसतिगृहांत राहाणाऱ्या तरुण मुलांमुलींमध्यें वाईट संगतीनें अथवा तशाच प्रकारच्या वाङ्मयामुळें ज्या दुष्ट गुप्त संवयी जडत आहेत, त्याकडे जनतेचें जावें तसें लक्ष जात नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे.

१० या संवयीमुळें त्या मुलांमुलींची वाढ दुबळी व उत्तरोत्तर क्षीण होऊन त्यांचीं शरीरें कायमचीं रोगग्रस्त होत्सातीं तीं मुलें अकाली मृत्युवश होतात.

११ पोटापाण्याच्या उद्योगासाठीं पाश्चात्य शिक्षणामध्यें निमग्न होऊन (जें शिक्षण परकीय सरकारनें स्वतःचें राज्य चालविण्यासाठीं फक्त स्वस्त पगाराचे कारकून निर्माण करण्याच्याच हेतूनें अस्तित्वांत आणलें आहे.) ऐन तारुण्याचा जोम या अभ्यासापायीं नष्ट होऊन लग्न होणें लांबणीवर पडतें चाललें आहे.

१२ म्हणून सर्व बाजूंनीं, सर्व तऱ्हांनीं पाश्चात्यांचेंच अंध दृष्टीनें अनुकरण न करतां आपणांपाशीं स्वयंसिद्ध स्वोद्धाराचीं काय उत्तम बिनपैशाचीं साधनें आहेत याची जाणीव उत्पन्न करवून तरुण व गृहस्थाश्रमी मंडळीपुढें स्वतःचें मानसिक व शारीरिक सामर्थ्य कसें सुलभ व साहजिक रीतीनें वाढवितां येईल यासाठीं प्रत्येकानें झटलें तरच त्याच्या अंतर्गत असलेल्या **जीवंत हिंदुत्वाचा** खरा उपयोग होईल.

१३ पाश्चात्यांचीं प्रचलित दिखाऊ शरीरें किती भयंकर प्रमाणांत वाळवीनें पोखरलेल्या घराप्रमाणें रोगग्रस्त आहेत हें जर्मन युद्धाच्या वेळीं डॉक्टरांनीं प्रतिपादन केलेलें आहे.

आपल्या ग्रँट मेडिकल कॉलेजच्या प्रख्यात् कर्नर कार्टर या प्रिन्सिपालच्या हाताखालीं अध्ययन केलेल्या डॉक्टरांना कार्टरसाहेब पाश्चात्यांचें National Drink ( सार्वजनिक पेय ) काय आहे हें हमेशा सांगत असल्याचें आठवत असेलच.

१४ जपानी लोकांचीं शरीरें पाश्चात्यांच्या शरीरांच्या ठेवणीपुढें तुलना केल्यास किती कमताकद दिसतात, पण तसें आहे काय ? गेल्या ३०–४० वर्षांत त्यांनीं कशी अघाडी मारली आहे याचा बारकाईनें विचार व्हावा.

१५ शेंकडों वर्षांपूर्वीं आपल्या या मायभूमीमध्यें वाममार्गाचा उपयोग करून पाहाण्यांत आला, आणि तो कुचकामी ठरल्यामुळें ऋषिमुनींनीं दूरवर नजर ठेवून त्याला फांटा दिला. सबब पाश्चात्यांचे प्रचलित वाममार्ग आपल्या कामाचे नाहींत; कारण त्यामुळें अधोगति ही ठरलेली.

१६ संतांच्या स्वानुभवयुक्त शिकवणीवर भार देऊन ऋषिकुळांतून ब्रह्मचर्येच्या उपयुक्ततेमुळें तयार झालेली जनता कशी तेजस्वी होती याचा उत्तम दाखला शिकंदर बादशाहाबरोबर असलेला हिरोडोटस म्हणून इतिहासज्ञ होता त्याचें वाक्य साक्ष देतें. तो म्हणतो कीं, No man was found telling a lie, and no woman unchaste. "एकही पुरुष असत्यवादी आणि एकही स्त्री व्यभिचारिणी नव्हती." ही शत्रुपक्षाकडील उक्ति आहे हें

सत्यान्वेषि सात्विक जनतेपुढें शिकंदराला व त्याच्या असुरी सैन्याला हात टेकावे लागले.

ही झाली त्या वेळेची गोष्ट; परंतु सत्यान्वेषीपणामुळें गृहस्थाश्रमी असूनही सशास्त्र ब्रह्मचर्याची महति प्रत्यक्ष कृतींत उतरवून दाखवून काय सामर्थ्य येतें याचें मूर्तिमंत स्वरूप महात्मा गांधी हे आपल्या दृष्टीपुढें आहेत.

पाश्चात्य संस्कृतीचा छाप त्यांच्यावर--त्यांच्या पूर्वाश्रमीच्या वर्तनावर पडला होता. तथापि त्यांचें पुढील वर्तन पाहा.

या एकाच व्यक्तीला सर्व जग हालवून सोडण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें आहे. त्यांची शरीरयष्टि ती काय ? त्यांना रंगरूप कांहीं तरी आहे काय ? "नास्ति तेषु जाति विद्यारूप कुल धन क्रियादि भेदा." या नारदुक्तीचें चालतें बोलतें स्वरूप ते आहेत कीं नाहींत ? आपणां सर्वांना ते अत्यंत आदरणीय व वंद्य वाटतात तें कां ? तर संतांच्या शिकवणीचें रहस्य जाणून त्याप्रमाणें आचरण ठेवून गृहस्थाश्रमी असूनही, ब्रह्मचर्याचें जें त्यांनीं शास्त्रोक्त पालन केलें त्यामुळेंच त्यांच्यांत हें अतर्क्य व अतुलनीय सामर्थ्य आलें आहे.

१७ चर्मचक्षूंनीं दिसणारे व न दिसणारे अशा वासनात्मक सूक्ष्म देहांनीं हें सर्व व्योम भरलेलें आहे. अणुरेणूमध्यें प्रत्येक रजःकणांत त्यांचा प्रतिक्षणीं बुजबुजाट आहेच. त्यांतला प्रत्येक लिंग, देह स्थूल-देह धारणेसाठीं सारखी धडपड करीत आहे. **किता अनंत कोटि** मानवदेहधारणोत्सुक अत्यंत सूक्ष्म पण जीवंत अशा परिमाणूंचा नाश होऊन त्यांतला एकच स्थूलदेह प्राप्त करून घेण्याला नशीबवान् होतो हें वर वर्णन केलेल्या सप्रमाण विवेचनावरून सिद्ध होतें आणि त्याच्या सत्यतेविषयीं **सर्व डॉक्टरांना** लेखक अत्यंत नम्रपणानें खुलें आवाहन करीत आहे.

याप्रमाणें परिस्थिति असल्यानें संतांनीं वर्णन केलेलीं व गाईलेलीं वाक्यें—**मानव देहधारण्यासाठीं चौऱ्यांयशी लक्ष योनींतून फिरावें लागतें**, खरीं ठरतात. किंबहुना त्यांनीं आपली बाजू फारच उदार प्रमाणांत ठेविलेली आहे. वस्तुस्थिति यापेक्षां कितीतरी बिकट आहे याचा

असें जर उघड उघड आहे तर या अप्रतिम नरतनूचा कोणत्या तऱ्हेनें खरा उपयोग होईल ? "अरे आ ु न कोण याचा रातदिस विचार करावा " या साईपदांजवळ ऐकलेल्या वाक्याचा सतत विचार करून जर संतांच्या वाक्यापासून अनुभव न घेतला तर श्रींच्याच शब्दांप्रमाणें "आलं वारं गेलं वारं " असें होऊन पुन्हां आपली मनुष्यदेह धारण करण्याची **कायमची भयंकर धडपड** ठेवलेलीच. ही गोष्ट आपणां हिंदवासियांस कधींही इष्ट नाहीं.

पाश्चात्यांस व केवळ माथेफिरू अशा परधर्मीयांस आपल्या या पवित्र हिंदमातेच्या पुत्रांत अनेक धर्म, चाली, रीति, परस्परांपासून विसंगत दिसणाऱ्या, अशा त्यांच्या बाह्य दृष्टीला दिसतात; परंतु संतांच्या संस्कृतीमुळें व त्यांच्या अप्रतिम शिकवणीमुळें ज्या सूक्ष्म पण दृढ रज्जूंनीं आम्ही सर्व जखडून बांधले जाऊन बाह्यात्कारीं निराळे दिसणाऱ्या अंतिम ध्येयासंबंधानें एक कसे आहोंत, याची जाणीव त्यांना असणें कठीण आहे.

म्हणून सर्व प्रकारच्या,सर्व धर्मांच्या स्त्री पुरुषांस स्वोन्नतीचा योग्य मार्ग सुलभ रीतीनें प्राप्त होवो, ही श्री साईबाबांच्या पायापाशीं आदरयुक्त नम्र प्रार्थना करून हा लेख आटोपता घेण्याची त्या परम दयाळू सद्गुरु माउलीची व सूज्ञ वाचकांची आज्ञा घेतों.

ता. २५--६--३१. } "**म्हातारा**"

# अहिंसा परमोधर्मः

( भगवद्गीता, अ. १३, श्लोक ७, पाद. २ )

श्रीसाईलीलाकर्ते यांस निलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे, मु. पुणें, यांचे कृ. सा. न. वि. वि.

परमप्रिय मित्र कै. हरि सीताराम उर्फ भाऊसाहेब दीक्षित यांनीं मला शिर्डीस सुमारें सन १९१७ मध्यें जो आपला एक स्वानुभव सांगितला होता, तो साईलीलेंत प्रसिद्ध झाला नाहीं, असा माझा समज आहे. ह्यास्तव तो आपणांस ह्याखालीं लिहून कळवीत आहें.

सर्प हा जीव घातक असल्यामुळें तो आपल्या दृष्टीस पडला तर त्याला मारावें किंवा नाहीं, असा प्रश्न श्रीबाबांना एकदां भाऊसाहेबांनीं विचारला असतां बाबा म्हणाले कीं, "आपण त्याला कधींही मारूं नये; कारण तो देवाच्या हुकुमाशिवाय आपला घात करणार नाहीं, व देवाचा हुकूम झाला असल्यास तो आपल्याला टाळतां येणार नाहीं." हें उत्तर ऐकून तदनुरोधानें वागण्याचा भाऊसाहेबांनीं पक्का निश्चय केला आणि पुढें थोडक्याच दिवसांत एकदां....ते प्रातर्विधि आटोपून प्रार्थनेस्तव श्रीबाबांच्या तसबिरीपुढें जाऊन उभे राहिले,तों त्यांना त्या तसबिरीवर एक मोठा सर्प दिसला. तो पाहून भाऊसाहेब प्रथमतः दचकले; परंतु त्यांना लागलीच बाबांच्या उपदेशाची आठवण होऊन स्वतः बाबाच आपली कसोटी पाहाण्या-स्तव सर्परूपानें तेथें प्रकट झाले आहेत, अशी त्यांची भावना झाल्यामुळें त्यांनीं त्या सर्पास नमस्कार करून म्हटलें कीं, "बाबा ! आम्ही मित्रीं माणसें अशा कसोटीस कशीं उतरणार ? आपण तसबिरीवर आहांत तोंपर्यंत तस-बिरीला गंधपुष्पें वाहण्याची माझी छाती होत नाहीं. ह्यास्तव आपण कृपा करून आतां येथून मुकाट्यानें दूर जावें." अशी त्यांनीं प्रार्थना केल्याबरोबर तो सर्प तसबिरीवरून उतरून कोठें गेला, तें भाऊसाहेबांना दिसलें नाहीं; कारण तो हालल्याबरोबर जवळ निजलेल्या मंडळीच्या बिछान्याकडे त्यांची दृष्टि लागलेली होती. भाऊसाहेबांनीं नंतर प्रथमतः तसबिरीला गंधपुष्पें वाहून

मग मंडळीला जागें केलें, व सर्व खोली चांगली झाडून पाहिली; परंतु त्यांना तो सर्प तेथें पुनः मुळींच दिसला नाहीं. असो. परमपूज्य मित्र साधुवर्य कै. विनायक रामचंद्र ऊर्फ अण्णासाहेब पटवर्धन यांच्या घरीं .ह्यापेक्षांही अतर्क्य असे सर्पाचे अनुभव त्यापूर्वी मला दोनदां आलेले असल्यामुळें मला बाबांच्या त्या लीलेचा मुळींच चमत्कार वाटला नाहीं. सत्पुरुषांच्या सामर्थ्यानें अशा लीला सहज होत असतात. "**चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र न खाती सर्प तया ॥**" ह्या संतोक्तीवर विवेकपूर्वक पूर्ण श्रद्धा मात्र पाहिजे; आणि ती नसली तर अशा सहज लीलासंबंधानें नाना कुतर्क चालणारच. व ह्याचसाठीं "**कल्पनेची बाधा । न हो कदा काळीं** ॥" अशी श्री ज्ञानेश्वरांनीं देवाला प्रार्थना केली आहे. कळावें. मिति वैशाख शुद्ध ७ शके १८५३.

रा. रा. श्रीसाईलीलाकर्ते यांस नीलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे यांचे कृ. सा. न. वि. वि. श्रीकृपेंकरून वैशाख शुद्ध द्वितीया शके १८५३ पावेतों डेक्कन जिमखाना, पुणें नंबर ४, येथें क्षेम असो विशेष.

आपले परम मित्र कै. हरि सीताराम ऊर्फ भाऊसाहेब दीक्षित यांनीं मला आपला एक स्वानुभव सांगितला होता, तो साईलीलेंत प्रसिद्ध झाला नाहीं,असा जो माझा समज आहे तो खरा असल्यास तो प्रसिद्ध करण्याकरितां आपणांस ह्याखालीं लिहून कळवीत आहें.

## सर्वांगपरिपूर्णता.

सुमारें १५ वर्षें होऊन गेलीं. कै. श्रीमंत बापूसाहेब बुट्टी ह्यांच्या नाशीक येथील पंचवटींतील इमारतींत आपल्या अग्निशाळेसाठीं जागा मिळाली तर पाहावी, अशा हेतूनें पंचवटींतील अग्निहोत्री मुळे शास्त्री यांनीं शिर्डी येथें बापूसाहेबांची गाठ घेऊन त्यांना आपला हेतु कळविला; तेव्हां आपल्या त्या इमारतींत अग्निशाळेला योग्य अशी जागा नाहीं, असें बापूसाहेबांनीं त्यांना सांगितलें, आणि ती सर्व इमारत स्वतः पाहून तेथें योग्य जागा आहे असें वाटल्यास ती देण्याचेंही त्यांनीं कबूल केलें. हें बापूसाहेबांचें म्हणणें ऐकल्या-वर इमारत स्वतः पाहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें सांगून शास्त्रीबावांनीं जेव्हां परत जाण्याचा बेत ठरविला, तेव्हां श्री. साईनाथांची आज्ञा घेतल्याशिवाय शिर्डीहून प्रायः कोणीहि परत जात नसल्याकारणानें बापूसाहे-बांनीं त्यांना श्रींची आज्ञा घेऊन परत जावें, असें सुचविल्यामुळें ते म्हणाले कीं, "मशीदींतील भ्रष्टपणाशीं कोणत्याही प्रकारें आपला प्रत्यक्ष संबंध यावा अशी आपली इच्छा नाहीं." हें बोलणें ऐकून बापूसाहेबांनीं सांगितलें कीं, आपणांला मशीदींत कोणाचाहीं स्पर्शसुद्धां होऊं न देण्याची आम्हीं तजवीज करूं आणि आम्हींच आपणांसाठीं त्यांची आज्ञा मागूं. शिष्टाचाराच्या दृष्टीनें हें बापूसाहेबांचें म्हणणें शास्त्रीबावांना मान्य करावें लागलें, आणि दुसरे दिवशीं श्रींची आज्ञा घेण्याचें ठरलें. हें सर्व भाषण जेव्हां श्री. भाऊसाहेब दीक्षित यांच्या वाडयांत झालें, तेव्हांच तें श्रींच्या अतींद्रियज्ञानानें त्यांना कळलें, आणि दुसरे दिवशीं सकाळीं सुमारें ९ वाजतां श्री लेंडीवर जातांना साठे यांच्या वाडयाजवळ जेव्हां त्यांच्या दर्शनासाठीं नित्य रिवाजाप्रमाणें मंडळी जमली, तेव्हां श्री म्हणाले कीं, " आज आपल्याला थोडासा गेरू आणला पाहिजे. " ह्या भाषणाचा अर्थ कोणासच न कळल्यामुळें मंडळींनीं त्याच्याकडे दुर्लक्ष केलें. नंतर दुपारच्या आरतीच्या वेळेस सर्व मंडळी जमून अग्निहोत्री मुळे शास्त्री मशीदीच्या सभामंडपांत अगदीं दूरच्या एका कोपऱ्यांत उभे राहिल्यावर आरतीस सुरवात झाली, व आरती चालली असतांना मुळे शास्त्री यांना

प्रथमतः जी मूर्ति साईनाथ रूपानें दिसत होती, तीच मूर्ति नंतर त्यांच्या ब्रह्मीभूत संन्यासी गुरूच्या रूपानें फक्त त्यांनाच दिसूं लागल्यामुळें, ते संचार झाल्याप्रमाणें एकाएकी मशींदींत धांवत गेले, व त्यांनीं श्रींचे पाय घट्ट धरिले आणि आपल्या नेत्राश्रूंनीं त्या पायांवर अभिषेक केला. हा प्रकार पाहून सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली; कारण त्या असंभवनीय कृत्याचा हेतु मुळे शास्त्र्यांशिवाय कोणासच कळला नाहीं.

शेवटीं आरती संपून नैवेद्यसमर्पणानंतर सर्व मंडळी मशींदींतून बरोबर जात असतां मित्र कै. भाऊसाहेब दीक्षित यांच्या प्रश्नावरून मुळेशास्त्री यांनीं जेव्हां त्यांना खरा प्रकार कळविला, तेव्हां त्या दिवशीं सकाळीं लेंडीवर जातांना श्रींच्या मुखांतून जे शब्द निघाले होते, त्यांच्या गूढार्थाचा पक्का निकाल लागला.

हा प्रकार मित्र कै० भाऊसाहेब दीक्षित ह्यांनीं जेव्हां मला सांगितला तेव्हां आठवे वर्षापासून ज्याचें मी पुत्रवत् पालन केलें होतें ते कै. हरि गणेश ठकार हे नाशिक येथें मामलेदार असल्यामुळें मीं त्यांना मुळे शास्त्री यांची गांठ घेऊन त्यांचा शिर्डी येथील जो कांहीं अनुभव असेल तो ते सांगतील तशाचा तसाच मला कळविण्याविषयीं मोघम पत्र लिहिलें, आणि नंतर त्यांनीं आपल्या जबाबांत मुळे शास्त्र्यांच्या तोंडचे शब्द म्हणून जो मजकूर मला कळविला त्यांत वरील सर्व प्रकारचें शब्दशः सविस्तर वर्णन होतें.

सन १९१०-११ मध्यें सद्गुरुसान्निध्यांत माझा जो सुमारें तीन महिन्यांचा काळ गेला, त्यांत अशा प्रकारचे अनेक अतर्क्य अनुभव आल्यामुळें " यो बुद्धेः परतस्तु सः " ( गीता ३-४२ ) ह्या भगवदुक्तीचें रहस्य मनांत पक्कें बिंबलें आहे. आत्मानात्मविवेकी पुरुषाच्या स्वानुभवास मिथ्या म्हणणें हा अक्षम्य प्रमाद होय; तथापि "A cat may look at a king" असा प्रकार ह्या जगांत नेहमीं चालणारच. कारण "

श्री नीळकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे यांस........

श्री. मुळे शास्त्री यांची हकीकत कै. गो. र. दाभोळकर यांनीं आपल्या श्री साईसच्चरिताच्या बाराव्या अध्यायांत (पानें २११–२१८) उत्कृष्ट रीतीनें वर्णिलेली आहे. तरीपण त्याच गोष्टीविषयीं आपण स्वतंत्र रीतीनें तपास करून ती लिहून पाठवीत आहांत हें आपणांस श्रेयस्कर आहे. सबब ती हकीकत गद्यरूपानें आपल्या लेखणींतून जशीच्या तशीच छापल्यास तिची केवळ द्विरुक्ति न होतां, अशा हकीकती स्वतंत्र रीतीनें तपास केल्यावरही त्यांचें खरेपण निदर्शनास येतें, ही गोष्ट कांहीं लहानसहान नाहीं...........

आपल्या लेखणींतून अशा प्रकारचे आपले अनुभव आपण प्रसिद्धीसाठीं पाठवून श्रींच्या भक्तमंडळीस कृतार्थ कराल, अशी पूर्ण उमेद व आशा आहे..

आपला,

**रा. आ. तर्खड**

संपादक:–श्रीसाईलीला.

कल्याण । आपुलें उभयतांचें जाण । साई महाराज कृपाघन । वळेल आपणावरी ॥ २४२ ॥ जे या साईचरित्रासी । श्रवण करितील प्रेमेंसी । त्यास रक्षील हृषीकेशी । सत्यसत्य त्रिवाचा ॥ २४३ ॥ पुढील अध्यायीं कथा गहन । त्रिवर्गासी उपदेशकथन । तो उपदेश करितां श्रवण । पुरुषार्थ चारी साधतील ॥ २४४ ॥ दास गणूचे बोबडे बोल । तुम्हीं ऐका हो भक्तप्रेमळ । साईचरणीं अर्पितां भाळ । इच्छा पुरतील मनींच्या ॥ २४५ ॥ याचें जो करी पारायण । त्याचे पापा होय दहन । पाठी राखील नारायण । तयाची ती सर्वदा ॥२४६॥ स्वस्तिश्री भक्तलीलामृत । रम्य बाबांचें पवित्र चरित्र । हें केवळ परमामृत । सेवा सेवा गणू म्हणे ॥ २४७ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु । शुभंभवतु ॥ ॥ ॥

॥ इति एकत्रिंशोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय ३२ वा.

श्रीगणेशाय नमः ॥ हे चित्स्वरूप सर्वेश्वरा । आनंदमूर्ते उदारा । स्वयं प्रकाशा निर्विकारा । सर्वावस्थातीत तूं ॥ १ ॥ ऐसें तुझें अगम्य रूप । मी न जाणे मायबाप । जेथें वेदही साक्षेप । नेति नेति म्हणतसे ॥ २ ॥ वसिष्ठ भृगू पाराशर । जे ज्ञान नभींचे भास्कर । यांनाही तुझा न लागला पार । मग मी तेथें काजवा किती ॥ ३ ॥ हें असो दे कांहीं देवा । परी मी तुझा करितसे धांवा । मम मनीं वास करावा । हा ग्रंथ वदविण्यास्तव ॥ ४ ॥ तया शिर्डी ग्रामासी । आले साईच्या दर्शनासी । नानासाहेब पुण्यराशी । दुसरे नाना निमोणकर ॥ ५ ॥ चांदोरकरांनीं पदीं माथा । ठेवून बोलले तत्वतां । हें साई महाराज समर्था । पुरे आतां हा संसार ॥ ६ ॥ अवघीं शास्त्रें संसाराशीं । निःसार आहे म्हणती ऐशी । ह्या प्रपंचरूप शृंखलेसी । तोडीं सत्वरीं दीनबंधो ॥ ७ ॥ जों जों सुखाची हांव धरावी । तों तों दुःखाची स्वारी व्हावी । आशा सटवी नाचवी । ठाईं ठाईं आम्हांला ॥ ८ ॥ शोधूं जातां संसारांत । सुखाचा न लेश सत्य । मी कंटाळलों त्याप्रत । नको संबंध तयाचा ॥ ९ ॥ ऐसें ऐकतां त्यांचें भाषण । बाबा बोलले हांसून । हें भक्तेंच वेड्या मोहक ज्ञान । कोठून तुज उदेलें ॥ १० ॥ तुझी आहे सत्य गिरा । परि चुकतोस वेड्या जरा । यावद्देह तावत् खरा । आहे संसार पाठीशीं ॥ ११ ॥ तो न चुकला कोणासी । मग तूं त्या कैसा सोडिसी । तो तोडितां नये मशीं । मीही त्यांत गुंतलों ॥ १२ ॥ संसाराचीं रूपें अनेक । तीं मी सांगतों तुज देख । देहावरी आहे झाक । पहा तया संसाराची ॥ १३ ॥ काम मोह मद मत्सर । यांचा जो कां परस्पर । संबंध तोही संसार । आहे बापा शिष्योत्तमा ॥ १४ ॥ डोळे पदार्थ पाहती । कर्ण ध्वनीतें ग्रहण करिती । रसना रसातें

सेविती। याचेंही नांव संसार ॥ १५ ॥ मनाचे जे जे व्यापार। त्याचेंही नांव संसार। शारीर धर्म साचार। अवघे संसाररूपीं बा ॥ १६ ॥ स्वरूप या संसाराचें। मिश्रण दोन वस्तूंचें। तें हें संसारबंधन साचें। तुटलें नाहीं कोणास ॥ १७ ॥ दारा पुत्र कन्यादिकासी। संसार म्हणती निश्चयेसी। तो मात्र ओखटा तुशी। वाटूं लागला सांप्रत ॥ १८ ॥ दारा पुत्र कन्या जाण। बंधू भाचे पुतणे स्वजन। यांच्या त्रासें सेविलें रान। परी न सुटे संसार हा ॥ ९ ॥ ऐसें वदतां गुरुवर। काय बोलती चांदोरकर। हा शेवटला संसार। नको बाबा मात्र मशीं ॥ २० ॥ या शेवटल्या संसारीं। दुःख होतें नानापरी। वरले संसार निर्धारीं। अवघे ईश्वरनिर्मित ॥ २१ ॥ त्यां न कोणाचा उपाय चाले। ते पाहिजेत अवघे केले। शेवटल्यास मात्र विटलें। मन सोडीव त्यांपासून ॥२२॥ तई बाबा म्हणती हांसत। तो तुझा तूंच केला निर्मित। मग आतां त्याप्रत। कंटाळून काय होतें ॥ २३ ॥ संचित क्रियमाण पूर्वीचें। देह प्रारब्ध फळ त्याचें। हेंच देह प्रारब्ध जन्माचें। आहे मूळ कारण ॥ २४ ॥ तें देह प्रारब्ध भोगिल्याविण। न सुटे कवणा-लागून। तें भोगण्या कारण। प्राणी जन्म पावती ॥ २५ ॥ गरीब मध्यम श्रीमान। प्रापंचिक ब्रह्मचारी जाण। वानप्रस्थ संन्यासी पूर्ण। उच्च नीच अवघे ॥ २६ ॥ घोडा बैल कोल्हा मोर। व्याघ्र गेंडा तरस घार। श्वान बिडाल सूकर। विंचू सर्प मुंग्या पिसा ॥ २७ ॥ ह्या अवघ्यांच्या अस्तित्वासी। प्राण कारण निश्चयेसी। तो प्राण अवघ्यापाशीं। आहे एकसारखा ॥ २८ ॥ मग बाह्य स्वरूपीं भिन्नत्व। कां दिसावें जगतांत। याचा विचार मनांत। केलास कां त्वां कधीं तरी ॥ २९॥ याचा विचार करूं जातां। ऐसें कळों येईल तत्वतां। कीं हें संचित क्रियमाण सत्ता। म्हणोन प्राणी भिन्न भिन्न ॥ ३० ॥ [illegible]

होय तुज साची । खऱ्या सुखदुःखाची । व्याख्या एक सांगतों ॥६३॥ मुक्ति हेंच खरें सुख । जन्ममरण फेरा हेंचि दुःख । या व्यतिरिक्त दुसरी भ्रामक । आहेत बापा सुखदुःखें ॥ ६४ ॥ असो आतां या संसारीं । तुवां वागावें कैशापरी । हें मी सांगतों निर्धारीं । तिकडे अवधान द्यावें तुवां ॥ ६५ ॥ देह प्रारब्धानुरोधें । प्राप्त स्थिती तिच्यामध्यें । आनंद मानूनी रहावें बुधें । खोटी तळमळ करूं नये ॥ ६६ ॥ घरीं आलिया संपत्ति । आपण नम्र व्हावें अति । फळें येतां लीन होती । वृक्ष जैसे शिष्योत्तमा ॥ ६७ ॥ हें नम्र होणें चांगलें । परी न सर्वाठायीं भलें । दुष्ट दुर्जन ओळखिलें । पाहिजेत पुरे या जगतीं ॥६८॥ कां कीं धनिक नम्र होतां ।यांना फावे तत्वतां । म्हणून दुष्टीं कठोरता । धरिली पाहिजे मानसीं ॥६९॥ साधु संत सज्जन । यांचा राखणें मान । लीन व्हावें लव्हाळ्याहून त्यांचे ठायीं सर्वदा ॥ ७० ॥ श्रीमंती दुपारची छाया । हें न जावें विसरूनियां । धन मद अंगीं आणूनियां । न छळी कोणा निरर्थक ॥७१॥ आपुली प्राप्ति पाहून । दान धर्म करावा जाण । उगीच कर्ज काढून । उधळेपणा करूं नये ॥ ७२ ॥ प्रपंच जरी अशाश्वत । परी तें प्रारब्ध सत्य । तो प्रपंच करण्याप्रत । द्रव्य अवश्य पाहिजे ॥ ७३ ॥ शरीरीं जैसी आवश्यकता ।आहे पित्ताची तत्वतां । तैसी प्रपंचीं ज्ञानवंता । आहे या धनाची ॥७४ ॥ अवश्य वस्तु जरी हें धन । परी त्यांतची न गोवीं मन । राहूं नको कदां कृपण । उदार बुद्धि असावी ॥ ७५ ॥ परी फाजील उदारता । नाहीं कामाची सर्वथा । द्रव्य अवघें संपून जातां । कोणी न विचारी मागुनी ॥७६॥ उदारपण उधळेपण । या दोघांची सांगड जाण । एके ठिकाणीं घातल्या पूर्ण । होईल बापा अनर्थ ॥ ७ ॥ द्रव्य दानीं पहाणें योग्यता । तैसीच त्याची आवश्यकता । याचा विचार तत्वतां ।

मुलें समस्त । एखादें सार्वजनिक । कृत्य योग्य द्रव्यदानासी ॥७९॥ तैसीच योग्य विद्वाना । पाहून करी संभावना । अनाथ स्त्रीच्या बाळंतपणा । यथाशक्ति मदत करी ॥८०॥ अन्नदानाचे प्रकार तीन । विशेष नित्य कार्या कारण । विशेष जें कां अन्नदान । तें केव्हां करावें ॥ ८१ ॥ घरीं संपत्ति बहु आलिया । काळ अनुकूळ असलिया । सदिच्छा मनीं झालिया । सहस्रभोजन घालावें ॥ ८२ ॥ तेथें उच्च नीच भेद नाहीं । तें चहूं वर्णी श्रेष्ठ पाही । सुष्ट दुष्ट अवघेही । योग्य या अन्नदानातें ॥ ८३ ॥ भंडारा अथवा प्रयोजन । हे याचेच भेद पूर्ण । परी हें कर्ज काढून । करूं नये कदांही ॥ ८४ ॥ आतां नित्य अन्नदानासी । योग्य कोण सांगतों तुशीं । पांथिक तापसी संन्यासी । तडी तापडी भुकेलेला ॥ ८५ ॥ मागुनियां कोरान्न । जे करिती विद्यार्जन । ऐशा माधुकऱ्या लागून । नित्यान्न घालावें ॥ ८६ ॥ लग्न मौंजी ऋतुशांति । सण व्रतोद्यापन निश्चितीं । या अवघ्या प्रसंगाप्रति । कार्या कारण म्हणावें ॥८७॥ या कार्या कारण प्रसंगास । बाहणें इष्ट मित्रास । आप्त सखे सोयऱ्यास । आदरें द्यावें अन्न बापा ॥८८॥ हे अन्नदानाचे प्रकार । तुज कथिले साचार । योग्या योग्य विचार तोही पैं कथन केला ॥८९॥ वस्त्रदानाची हीच स्थिती । हें विसरूं नको कल्पांती । आपुल्या अंगीं असल्या शक्ति । पर पीडा नित्य निवारावी ॥९०॥ हातीं कांहीं असलिया सत्ता । तिचा दुरुपयोग न करणें सर्वथा । न्यायासनीं बैसतां । लांचलुचपत घेऊं नको ॥ ९१ ॥ ज्या कार्याची जबाबदारी । नेमिली असेल आपुल्या शिरीं । तें कार्य उत्तम करी । वाहून काळजी तयाची ॥ ९२ ॥ बाजवीपेक्षां फाजील देख । न करावा पोषाख । अहंपणाची झांक । आणून तोरा दावूं नको ॥९३॥ कांहीं नसतां कारण । कोणाचा

कन्या पुत्र दास दासी। ह्या देह प्रारब्धें प्राप्त तुशीं। झाल्या असती तयाशीं। वागवावें प्रीतीनें ॥९५॥ दारा पुत्र कन्या स्वजन। या माझें माझेंचि म्हणून। मनीं वाहतां अभिमान। कारण जन्ममरणासी ॥९६॥ कां कीं हें देह प्रारब्ध सकल। येथेंचि अवघें सरेल। त्याचा लेशही न उरेल। अंतीं संगति यावया ॥९७॥ या अवघ्यांची महति। आहे याच जन्मा पुरती। मागल्या जन्मींचे निश्चितीं। कोठें आहे गणगोत ॥९८॥ ते ज्या त्या जन्मींच सरून जाते। वासना मात्र बद्ध करिते। तीच वासना कारण होते। पुढलिया जन्मासी ॥९९॥ ह्मणून या स्वकीयांचा। खोटा मोह न वाही साचा। तरीच अक्षय सुखाचा। लाभ होईल तुजलागीं ॥१००॥ जैसे आपण धर्मशाळेंत। जातों क्षणेक रहाण्याप्रत। तात्पुरती सोय येथ। घेतों आपण करूनि ॥१०१॥ ह्मणून त्या धर्मशाळेचा। मोह ना आपणा उपजे साचा। तोच प्रकार येथींचा। प्रपंच ही धर्मशाळा ॥१०२॥ ऐसें प्रत्येकानें वागावें। कर्तव्य आपुलें करावें। तें करीत असतां ओळखावें। सच्चिदानंद ईश्वरा ॥१०३॥ पुत्र आपला आणि पराचा। निर्माणकर्ता एकचि साचा। परी आपुल्या पुत्राचा। भार स्थापिला आपुल्या शिरीं ॥१०४॥ ह्मणून त्याचें संगोपन। करोनि उत्तम शिक्षण। द्यावें थोडें बहुत धन। त्यासाठीं ठेवावें ॥१०५॥ परंतु मीच पुत्रास पोशिलें। मीच त्यास शिक्षण दिलें। मीच त्यासाठीं ठेविलें। धन ऐसें मानूं नको ॥१०६॥ कर्तव्य आपण करावें। कर्तृत्व ईश्वरा द्यावें। फळही त्यासच समर्पावें। अलिप्त आपण रहावया ॥१०७॥ ज्ञानाचा करून उपयोग। बरें वाईट जाणे सांग। जे जे बरें त्यासी अंग। देऊन वाईट टाकावें ॥१०८॥ उत्तम कार्य हातीं घ्यावें। तें तें नाना प्रयत्नें शेवटास न्यावें। कीर्तिरूपें उरावें। मागें मरून गेल्या-

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाई लीला**